# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**प्रादेशिक कार्यालय कल्याण/उप-प्रादेशिक कार्यालय, कल्याण ३**
सिध्दीविनायक संकूल ३रा व ४ था मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड,
कल्याण (पश्चिम), जिल्हा ठाणे - ४२१३०१
**फोन नं :** (०२५१)-२३१०१६७, (०२५१)-२३१०२१२, **फॅक्स नं :** ०२५१-२३१०१९२,
**वेबसाइट :** https://www.mpcb.gov.in **ईमेल :** rokalyan@mpcb.gov.in/ srokalyan3@mpcb.gov.in

## पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची सुचना

मे. शिवकृपा स्टील आणि ॲलाय प्रा. लि. गट क्रं. ५४, ११/१/अे गाव तोरणे, वार्शिद रोड, ता. वाडा, जि. पालघर या प्रकल्पाच्या एम.एस. बिलेटस चे उत्पादन ४०००० TPA पासून ६०००० TPA पर्यंत विस्तारीकरणासाठी (जुनी प्रवर्तन भट्टी (१५ टन) बदलून नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली प्रवर्तन भट्टी (१५ टन) आणि अतिरिक्त टीएमटी राउंड बार्सचे ६०००० TPA उत्पादन घेण्यासाठी पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव म.प्र.नि. मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सूचना, विचार, टिका टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी पर्यावरण विषयक लोकजनसुनावणीचे आयोजन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| **सुनावणीचे ठिकाण** | : | **मे. शिवकृपा स्टील आणि ॲलाय प्रा. लि. गट क्रमांक ५४, ११/१/अे गाव तोरणे, वार्शिद रोड, ता. वाडा, जि. पालघर या उद्योगाच्या कारखाना परिसर.** |
| **लोकसुनावणीची तारीख** | : | **०६/०१/२०२३** |
| **लोकसुनावणीची वेळ** | : | **सकाळी ११.०० वाजता.** |

सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था तसेच सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवासी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येतील.

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर किंवा वरील ईमेल द्वारे पाठविण्यात याव्यात-

**प्रादेशिक कार्यालय,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**
**श्री. सिध्दीविनायक संकुल, तिसरा मजला,**
**ओक् बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (प.)**
**जि. ठाणे. पिन नं. ४२१३०१.**

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले दस्तावेज व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, मराठी व इंग्रजी सारांश प्रती माहितीस्तव व अवलोकनार्थ खालील कार्यालया मध्ये उपलब्ध करण्यात आलेले असून सदरचे दस्तावेज कार्यालयीन वेळेत अवलोकनास उपलब्ध होतील.

१. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईंट, तिसरा व चौथा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड, नं. ८, सायन पूर्व, मुंबई - २२.
३. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, जि. पालघर.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर.
५. उप विभागीय अधिकारी, ता. वाडा, जि. पालघर.
६. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण.
७. तहसिलदार, वाडा, तहसिल कार्यालय, ता. वाडा. जि. पालघर.
८. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाडा, ता. वाडा. जि. पालघर.
९. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र उद्योग भवन, पालघर, जि. पालघर.
१० सरपंच, ग्रुप-ग्रामपंचायत, तोरणे, ता.वाडा. जि. पालघर.

सही/-
**उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण ३**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण**